# नॅशनल फार्मसी विकनिमित्त स्टेट लेवल ई-पोस्टर स्पर्धा व व्याख्यानाचे आयोजन

**जयसिंगपूर (प्रतिनिधी) :** डॉ. जे. जे. मगदूम फार्मसी कॉलेज, जयसिंगपूर येथे नॅशनल फार्मसी विक (१६ नोव्हेंबर ते २२ नोव्हेंबर) निमित्त स्टेट लेवल ई-पोस्टर स्पर्धा आणि व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. स्पर्धक विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि शिक्षकांचे सक्रिय सहकार्य यामुळे कार्यक्रमाला उत्साहवर्धक प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. श्रेया मगदूम यांनी आत्मविश्वासपूर्ण व प्रभावी शब्दांत केले आणि प्रमुख पाहुणे डॉ. संदीप बी. पाटील यांची संक्षिप्त ओळख करून दिली. कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमा पूजनाने झाले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शितलकुमार एस. पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन पाहुण्यांचे स्वागत केले आणि त्यांच्या संशोधनपर कार्याचा विद्यार्थ्यांना होणारा लाभ अधोरेखित केला.

डॉ. संदीप पाटील यांनी आपल्या प्रभावी व्याख्यानात व्हॅक्सिन विकासातील सखोल संशोधन प्रक्रिया विद्यार्थ्यांना समजावून सांगितली.




औषधातील काही घटक शरीरासाठी अपायकारक ठरू शकतात या मुद्द्यावर त्यांनी उदाहरणांसह प्रकाश टाकला. अशा परिस्थितीत संशोधनाद्वारे पर्यायी सुरक्षित घटक शोधण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. संशोधनासाठी उपलब्ध आर्थिक सहाय्य संस्थांची माहिती देत त्यांनी विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण संशोधनाची दिशा दाखवली. विविध आजारांपासून संरक्षण देणाऱ्या लसींचे महत्त्व त्यांनी प्रत्यक्ष अनुभवांच्या माध्यमातून स्पष्ट केले.

स्टेट लेवल ई-पोस्टर स्पर्धेत राज्यभरातील सत्तरहून अधिक स्पर्धकांमध्ये तीव्र स्पर्धा पाहायला मिळाली.

विजेत्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक, प्रमाणपत्र आणि रोख रक्कम प्रदान करण्यात आले. तृतीय क्रमांक कु. श्रद्धा परिट (आण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ फार्मसी, आष्टा), द्वितीय क्रमांक श्रद्धा वाशीकर (डॉ. जे. जे. मगदूम फार्मसी कॉलेज, जयसिंगपूर) तर प्रथम क्रमांक कु. नम्रता सूर्यवंशी (भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी, पलूस) यांनी पटकावला.

कार्यक्रमाला संस्था चेअरमन डॉ. विजय मगदूम, व्हाईस-चेअरपर्सन ॲड. डॉ. सोनाली मगदूम, कॅम्पस डायरेक्टर डॉ. सुनील आडमुठे आणि प्राचार्य डॉ. शितलकुमार पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. प्रा. स्नेहल पाटील आणि प्रा. प्राजक्ता गुरव यांनी कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन व आयोजन केले. कार्यक्रमाचा समारोप आभारप्रदर्शनाने झाला.

# नृसिंहवाडीची सई पुजारी पाच सुवर्णांसह राष्ट्रीय जलतरणविश्वात चमकली